स्थायी समितीच्या **शनिवार दिनांक 16–04–2016** रोजी **दुपारी 12–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत** | **सभापती** | |
| 2. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य | |
| 3. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य | |
| 4. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्या | |
| 5. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या | |
| 6. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्या | |
| 7. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्या | |
| 8. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्या | |
| 9. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्य | |
| 10. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्य | |
| 11. | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या | |
| 12. | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य | |
| 13. | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या | |
| 14. | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य | |
| 15. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या | |

## अनुपस्थित सभासद

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य | |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 74</u>:– प्रभाग क्र. १७ अ अंतर्गत राऊत चौक ते दलालपुरा चौक, गुजरी चौक ते बाहुली विहिर, चकणा चौक ते बस्तरवारी शालीग्राम चौक ते स्विपर कॉलोनी मध्ये भुमिगत नाली टाकण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. उल्हास इंटरप्राईजेस यांची वाटाघाटीनंतर प्राकलनिय दरापेक्षा ९.५% प्रतिशत ने कमी दराची रु. ४५,२४,४७५/– रकमेची निम्नतम

निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 75</u>:– प्रभाग क्र. २९ अ हंसापुरी येथील गितांजली टॉकीज ते जुना भंडारा रोड पर्यंत सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त ९ निविदांपैकी मे. एस. के. एन्टरप्राईजेस यांची प्राकलनिय दरांपेक्षा १.६ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. ४९,१२,७२७/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 76</u>:– प्रभाग क्र. 68 ब, अंतर्गत रस्त्याचे विविध ठीकाणी रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. अमृत कंस्ट्रक्शन हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 1.97 टक्के अधिक दराची निविदा रूपये 30,55,195/– ( रूपये तिस लक्ष पंचावन हजार ऐकशे पंचानऊ रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेणे हे काम पद क्रमांक 680 (A42001374612) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 77</u>:–
{लोककर्म विभाग}
ग्रेट नागरोड ते जुनी शुक्रवारी, नागनदीवर असलेला जुना अस्तित्वातील पुल अरूंद असल्याने व नेहमीच वाहतुकीची कोंडी होत असल्याने त्या ठिकाणी मंजुर चार पदरी पुल बांधण्याचे कामाचे निविदा राशी रू. 1,45,08,880/– मध्ये निविदेतील मुळ व्याप्ती व या कामातील अतिरीक्त तांत्रीक बाबीमुळे झालेल्या बदलाने अतिरिक्त बाबीसह खालीलप्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार

**मुळ प्राकलन**

| | |
|---|---|
| अ) कामाची मुळ मंजुर प्रशासकीय किंमत | – रू. 1,91,41,478/– |
| ब) कामाची निव्वळ प्राकलनिय राशी | – रू. 1,64,90,659/– |
| क) कामाची कार्यादेश राशी (12.06% कमी) | – रू. 1,45,08,880/– |

**सुधारीत प्राकलन**

| | |
|---|---|
| ड) या कामावर मंजुर बाबी व 125% पर्यंत quantity CSR 2012-13 चे दारानुसार किंमत | – रू. 1,89,81,170/– |
| (–) मंजुर निविदानुसार 12.06% नुसार कमी. | – रू. 22,89,129/– |
| | **– रू. 1,66,92,041/–** |
| इ) 125% पेक्षा अधिकच्या quantity ला 2015–16 चे सी. एस. आर. प्रमाणे किंमत. | – रू. 1,04,98,780/– |
| (–) कंत्राटदाराने मुळ मंजुर निविदानुसार 12.06% कमी केले | – रू. 12,66,153/– |
| | – रू. 92,32,627/– |

उपरोक्त (ड) रू. 1,66,92,041 + (इ) रू. 92,32,627 प्रमाणे या कामाचे एकुण **रू. 2,59,24,668/–** च्या सुधारीत राशीस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तथा सुधारीत बाबींमुळे अतिरीक्त खर्चाकरीता (रू. 2,59,24,668 – रू. 1,45,08,880) रू. 1,14,15,788/– राशीचा अतिरिक्त कार्यादेश या कामाचे मुळ कंत्राटदार मे.

सुविचार कन्स्ट्रक्शन्स् यांना मुळ मंजुर निविदा अटी व शर्ती चे अधिन, निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 78:– शहर स्वच्छता आराखडयानुसार नागपूर शहरास उघडयावर शौचास जाणाऱ्या लोकांच्या समस्येतुन सोडविण्यासाठी ''पैसे द्या व वापरा'' तत्वावर सार्वजनिक शौचालये बांधण्याचे व त्यांची देखभाल व दुरूस्ती विविध सेवाभावी अशासकीय संस्थेमार्फत करण्याबाबत स्थायी समीती ठराव क्र. 80, दि. 01.06.2015 नुसार मंजुरी प्रदान करण्यात आली असून याबाबत करावयाच्या करारनाम्याच्या प्रारूपासही मंजुरी देण्यात आलेली आहे.

स्थायी समीती ठराव क्र. 5, 6 व 7, दि. 16.03.2015 अन्वये अनुक्रमे महाराजबाग, सिरसपेठ व प्रजापतीनगर येथील कामे सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन यांचे व्दारे करून घेण्यास मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधीत संस्थेसोबत करावयाच्या करारनाम्यातील अट क्र. 13 व 26 मधे सुट देण्याबाबतचा प्रश्न तसेच,

अट क्र. 13 : If the party of second part itself constructs Sulabh Souchalaya unit for the party of the second part shall purchase all the material required for the construction from the market and shall submit the vouchers of the purchase to NMC.
अट क्र. 26 : The party of the first part shall impose the penalty fo Rs. 250/- per seat on the party of the second part for lack of proper upkeep and facilities and for to be negligent towards the complaints and complainable acts.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन स्थायी समिती ठराव क्र. 80 दिनांक 01.06.2015 स्थायी समितीने मंजूर केल्यानंतर निविदेच्या अटी व शर्ती मध्ये तत्कालीन कार्यकारी अभियंता बदल केला व त्यामुळे प्रस्तावित प्रकरणात आजपर्यंत कार्यादेश होऊ शकले नाही. करीता तत्कालीन कार्यकारी अभियंता यांना मुख्य अभियंता यांनी स्पष्टीकरण विचारावे व दोषी आढळल्यास पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी या सुचनेसह प्रस्तावित विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 79:– प्रभाग क्र. ४१ अ कर्नलबाग येथे मॉडेल मिल ते वाट निवास व ठाकुर यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त १० निविदांपैकी मे. आर. एस. नायडू यांची प्राकलनिय दरांपेक्षा १.०० टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. ४९,१७,५४४/– रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 80:– मौजा – हुडकेश्वर या भागातील १) आम्रपाली नगर, पवार नगर, शिवांगी नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण तसेच २) आम्रपाली नगर, पवार नगर, शिवांगी नगर येथील रस्त्याचे खडीकरणसह डांबरीकरण (ब्लाक – आय सेलेब्रेशन हॉल ते आम्रपाली नगर बोर्ड च्या मधातील रस्ते) करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण १४ निविदाकारांपैकी मे. एस. के. गुरूबक्षाणी यांची द्वित्तीय निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ४.३३ टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. १,३८,४५,०१५

/— रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 81</u>:—** प्रभाग क्र ८ अ तिरूपती बॅक ते काळबांडे नर्सींग होम ते रिंग रोड पर्यंत रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरणाचे कामासमे. प्रेमचंद राचुमल यांचा कार्यदिश क्रमांक ५०३/G दि. २५.०१. २०१० ला देण्यात आलेला होता परंतु वरील रस्त्याचे कामे नागपूर सुधारप्रन्यास मार्फत करण्यात आलेले असल्यामुळे वरील रस्त्याच्या डांबरीकरण खर्च त्याच परिसरातील एस. बी. आय. व आर. एम. एस कॉलनी यंथिल रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याकरिता मंजुरी मिळणेबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 82</u>:—** महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 124 (च) पोट कलम 2 मध्ये नमुद केल्याप्रमाणे, राज्य शासनास ते लादील अशा शर्तीच्या अधिन राहुन, शासकीय राजपत्रातील अधिसुचनेद्वारे, कोणत्याही शैक्षणिक संस्थेकडून, वैद्यकीय संस्थेकडून अथवा धर्मादाय संस्थेकडून कोणत्याही जमिनीच्या अथवा इमारतीच्या विकासावर देय असलेला विकास आकार देण्याच्या बाबतीत अंशतः सुट देता येईल. अशी तरतुद आहे.

उपरोक्त प्रमाणे महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे, शासन निर्णय क्र. टिपीएस—1293/32/प्र.क्र. 8/93/नवि—12 दि. 24.05.1993 नुसार शैक्षणीक संस्था, वैद्यकीय संस्था व धर्मादाय संस्था यास आकारावयाच्या विकास शुल्कामध्ये सुट नमुद केलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे उक्त नमुद संस्थेकरीता विकास शुल्कामध्ये सुट / सवलत प्राप्त होत असली तरी म.न.पा. दि. 29.06.2015 रोजी भरलेल्या स्थगीत विषेश सभेच्या ठराव क्र. 119 नुसार मंजुर व प्रचलित आकारावयाच्या शुल्कामध्ये शासन परिपत्रकामधील नमुद सुट / सवलतीनुसार विकास शुल्काशिवाय इतर आकारावयाचे शुल्कामध्ये पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सुट / सवलत प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन ज्या अर्थी नागपूर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली 2000 मधील तरतूद क्रमांक 15.4.2 (e) अन्वये जीना, पॅसेज, लॉबी, लिफ्ट वॉल अंतर्गत बांधकाम बांधीव क्षेत्र / चटईक्षेत्र निर्देशांका च्या क्षेत्रानुसार वगळण्याची तरतुद आहे. आणि रूग्णालय इमारती ज्या धर्मदाय संस्थांच्या आहेत, त्यांना प्रव्याजी (प्रिमियम) न आकारता मंजूरी देण्याची तरतुद आहे. त्याअर्थी या अंतर्गत बांधकामासाठी सुट देण्याचा प्रस्ताव सादर करून त्यावर निर्णय घेण्याची आवश्कता नाही. तेव्हा प्रशासनाने विकास नियंत्रण नियमावली —2000 मधील 15.4.2. ( e ) प्रमाणे कार्यवाही करावी असे ही स्थायी निर्देश देते.

सामासिक अंतर व इमारतीची अतिरीक्त उंची अनुक्रमे परिशिष्ट (3) मध्ये स्पष्ट केले असुन या करीता वेगळा प्रस्ताव देण्याची गरज नाही. तसेच म.न.पा. ठराव क्र. 148 दि. 23.09.2015 प्रमाणे दरात या आधीच सवलत प्रदान करून म.न.पा. सभागृहाने दर निश्चित केले आहे. असे असतांना प्रशासनाने सादर केलेल्या दरात सवलत प्रदान करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

परंतू स्थायी समितीच्या असेही निदर्शनास आले कि ठराव क्र. 148 दिनांक 23.09.2015 चे कार्यान्विकरण आज पर्यंत सहा. संचालक नगर रचना यांनी केले नाही किंवा प्रस्तावित विषय सादर करतांना ही बाब आयुक्तांच्या निर्दशनांस आणून दिली नाही. त्यामूळे सभागृहाने मंजूरी प्रदान केलेल्या ठरावाचे अद्याप पावेतो कार्यान्विकरण का केले नाही व परिपत्रक का काढण्यात आले नाही. या संबधात सहा.संचालक, नगर रचना यांचे कडून आयुक्तांनी स्पष्टीकरण मागवावे व या संबधीची माहिती

स्थायी समितीच्या पुढील सभेत सादर करावी या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ.क्र. | शासन निर्णय क्र. टिपीएस –1293/32/प्र.क्र. 8/93/ नवि–12 दि. 24.05.1993 अन्वये बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्ट 1950 अंतर्गत शैक्षणीक संस्था, वैद्यकीय संस्था व धर्मदाय संस्था असल्याचे नोंदणीकृत प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या इमारतीकरीता | तपशील | प्रचलित वर्षातील मुद्रांक शुल्क शिध्रसिध्द गणाकामध्ये उल्लेख केलेल्या जमिनीचे दरांचे प्रति चौ.मी. | | | शासन निर्णय क्र. टिपीएस–1293 /32/प्र.क्र. 8/93/नवि–12 दि. 24.05. 1993 अन्वये विकास शुल्कात अनुज्ञेय सुट | प्रस्तावित दर –प्रचलित वर्षातील मुद्रांक शुल्क शिध्रसिध्द गणाकामध्ये उल्लेख केलेल्या जमिनीचे दरांचे प्रति चौ.मी. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 180 चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्रफळाच्या भुखंडासाठी | 180 चौ.मी. ते 500 चौ.मी. क्षेत्रफळाच्या भुखंडासाठी | 500 चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या भुखंडासाठी | | 180 चौ. मी. पेक्षा कमी क्षेत्रफळाच्या भुखंडासाठी | 180 चौ.मी. ते 500 चौ.मी. क्षेत्रफळाच्या भुखंडासाठी | 500 चौ. मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या भुखंडासाठी |
| 1 | Institution imparting Primary Education (Including Pre-Primary & Creches ). | i. चटई क्षेत्र निर्देशांकातून वगळण्यात येणाऱ्या क्षेत्राकरीता आकाराण्यात येणारे प्रव्याजी (Premium) शुल्क. (जिना, पॅसेज, लॉबी, लीफ्ट वॉल)<br>ii. विकास नियंत्रण नियमावली 6.5. 2.3 मधील तरतुदींनुसार मा. आयुक्त यांना त्यांचे विशेष | 7.5% | 10% | 15% | 75% | 1.88% | 2.5% | 3.75% |
| | | अधिकारात, विशिष्ट प्रकरणांत सदर विकास नियंत्रण नियमावलीतील नमुद अंतरात / तरतुदीत, Health Safety, Fire Safety, Structural Safety, & publice Safety, इत्यादींचे अधिन राहुन सामासिक अंतरात / उंचीत / शिथिलतेसह | | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नियोजीत / प्रस्तावित बांधकाम नकाशाला मंजुरी देते वेळी आकारावयाचे अधिमुल्य (Premium) | | | | | | | |
| 2 | Institution imparting Secondary Education. | i. चटई क्षेत्र निर्देशांकातून वगळण्यात येणाऱ्या क्षेत्राकरीता आकाराण्यात येणारे प्रव्याजी (Premium) शुल्क. (जिना, पॅसेज, लॉबी, लीफ्ट वॉल)<br>ii. विकास नियंत्रण नियमावली 6.5. 2.3 मधील तरतुदींनुसार मा. आयुक्त यांना त्यांचे विशेष अधिकारात, विशिष्ट प्रकरणांत सदर विकास नियंत्रण नियमावलीतील नमुद अंतरात / तरतुदीत, Health Safety, Fire Safety, Structural Safety, & publice Safety, इत्यादींचे अधिन राहुन सामासिक अंतरात / उंचीत / शिथिलतेसह नियोजीत / प्रस्तावित बांधकाम नकाशाला | 7.5% | 10% | 15% | 50 % | 3.75% | 5.0 % | 7.50% |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजुरी देते वेळी आकारावयाचे अधिमुल्य (Premium) | | | | | | | |
| 3 | Instituting promoting Sport / Amusement parks, Arts & Sciences. | i. चटई क्षेत्र निर्देशांकातून वगळण्यात येणाऱ्या क्षेत्राकरीता आकाराण्यात येणारे प्रव्याजी (Premium) शुल्क. (जिना, पॅसेज, लॉबी, लीफ्ट वॉल)<br>ii. विकास नियंत्रण नियमावली 6.5.2.3 मधील तरतुदींनुसार मा. आयुक्त यांना त्यांचे विशेष अधिकारात, विशिष्ट प्रकरणांत सदर विकास नियंत्रण नियमावलीतील नमुद अंतरात / तरतुदीत, Health Safety, Fire Safety, Structural Safety, & publice | 7.5% | 10% | 15% | 50 % | 3.75% | 5.0 % | 7.50% |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Safety, इत्यादींचे अधिन राहुन सामासिक अंतरात / उंचीत / शिथिलतेसह नियोजीत / प्रस्तावित बांधकाम नकाशाला मंजुरी देते वेळी आकारावयाचे अधिमुल्य (Premium) | | | | | | | | |
| 4 | Medical Institutions. | i. चटई क्षेत्र निर्देशांकातून वगळण्यात येणाऱ्या क्षेत्राकरीता आकाराण्यात येणारे प्रव्याजी (Premium) शुल्क. (जिना, पॅसेज, लॉबी, लीफ्ट वॉल)<br>ii. विकास नियंत्रण नियमावली 6.5.2.3 मधील तरतुदींनुसार मा. आयुक्त यांना त्यांचे विशेष अधिकारात, विशिष्ट प्रकरणांत सदर विकास नियंत्रण नियमावलीतील नमुद अंतरात / तरतुदीत, Health Safety, Fire Safety, Structural Safety, & publice Safety, इत्यादींचे अधिन राहुन सामासिक अंतरात / उंचीत / शिथिलतेसह नियोजीत / प्रस्तावित बांधकाम नकाशाला मंजुरी देते वेळी | 7.5% | 10% | 15% | 25% | 5.63 % | 7.5% | 11.25 % |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आकारावयाचे अधिमुल्य (Premium) | | | | | | | |
| 5 | Charitable Institutions<br><br>i. Hostel for working women<br>ii. Hospice, care of of persons suffering from mental illness & handicaps<br>iii. Orphanage<br>iv. Home for aged and destitute & abandoned women, children & infants.<br>v. Convalescents<br>vi. Infirmary. | i. चटई क्षेत्र निर्देशांकातून वगळण्यात येणाऱ्या क्षेत्राकरीता आकाराण्यात येणारे प्रव्याजी (Premium) शुल्क. (जिना, पॅसेज, लॉबी, लीफ्ट वॉल)<br><br>ii. विकास नियंत्रण नियमावली 6.5.2.3 मधील तरतुदींनुसार मा. आयुक्त यांना त्यांचे विशेष अधिकारात, विशिष्ट प्रकरणांत सदर विकास नियंत्रण नियमावलीतील नमुद अंतरात / तरतुदीत, Health Safety, Fire Safety, Structural Safety, & publice Safety, इत्यादींचे अधिन राहुन सामासिक अंतरात / उंचीत / शिथिलतेसह नियोजीत / प्रस्तावित बांधकाम नकाशाला मंजुरी देते वेळी आकारावयाचे अधिमुल्य (Premium) | 7.5% | 10% | 15% | 75% | 1.88% | 2.5% | 3.75% |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | i. Correctional detention with restricted liberty of the inmates ordinarily providing Sleeping accommodation including Dharmashala, Sanatoria, Custodial.<br>ii. Penal Institutions<br><br>such as jails, prisons, mental hospitals, house of correction detention & reformatories.<br>iii. Special cases closely associated with promotion of cultural & other activities. | i. चटई क्षेत्र निर्देशांकातून वगळण्यात येणाऱ्या क्षेत्राकरीता आकाराण्यात येणारे प्रव्याजी (Premium) शुल्क. (जिना, पॅसेज, लॉबी, लीफ्ट वॉल)<br>ii. विकास नियंत्रण नियमावली 6.5.2.3 मधील तरतुदींनुसार मा. आयुक्त यांना त्यांचे विशेष अधिकारात, विशिष्ट प्रकरणांत<br><br>सदर विकास नियंत्रण नियमावलीतील नमुद अंतरात / तरतुदीत, Health Safety, Fire Safety, Structural Safety, & publice Safety, इत्यादींचे अधिन राहुन सामासिक अंतरात / उंचीत / शिथिलतेसह नियोजीत / प्रस्तावित बांधकाम नकाशाला मंजुरी देते वेळी आकारावयाचे अधिमुल्य (Premium) | 7.5% | 10% | 15% | 50% | 3.75% | 5.0 % | 7.50% |

<u>ठराव क्रमांक 83ः–</u> मौजा – हुडकेश्वर या भागातील १) श्यामनगर, संटपॉल शाळे जवळील एरीया येथील रस्त्याचे डांबरीकरण तसेच २) श्यामनगर, संटपॉल शाळे जवळील एरीया रस्त्याचे खडीकरणसह डांबरीकरण (ब्लॉक – के आम्रपाली बोर्ड ते सेटपॉल शाळा च्या मधातील रस्ते) करण्याचे कामास्तव

मागविण्यात आलेल्या एकूण १२ निविदाकारांपैकी मे. पी. के. कंन्स्ट्रक्शन यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ४.३३ टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. ६०,८५,९७०/— रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री. किशोर गजभिये :—मा.सभापती, नागपूर शहरातील एस.टी.स्थानक समोरील जागेत यापूर्वी नागपूर महानगरपालिकेचे सायकल स्टॅन्ड होते. आता त्या ठिकाणी सायकल स्टॅन्ड दिले आहे किंवा नाही या संदर्भात विभागाकडून याबाबत माहिती देण्यात यावी.

अधिकारीः— मा.सभापती, एस.टी. स्टॅन्डकरिता ई—निविदा काढून स्टॅन्ड नियमाप्रमाणे दिलेले आहे. 10 लक्ष 50 हजार रू.मध्ये ते टेंडर गेले आहे

श्री. किशोर गजभिये :—मा.सभापती, माझा दुसरा विषय असा होता, ही नवीन स्थायी समिती जेव्हापासून आली तेव्हा पासून जवळपास पाच—सहा बैठका झाल्या असतील. यापूर्वी विकासाच्या संदर्भात जेवढे विषय मंजूर केले ते रस्त्याचे असो, सिमेंट रस्त्याचे असो, गडरलाईनच्या संदर्भातील असो, किंवा इतर कोणत्याही कामाचे असोत. आपण जे विषय मंजूर केले त्यापैकी आतापर्यंत किती फाईलचे कार्यदेश दिलेले आहे त्याची माहिती स्थायी समितीला देण्यात यावी.

सभापतीः— पुढच्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये आजच्या सभेपर्यत जेवढे कार्यदेश दिले त्याची संपुर्ण अहवाल सादर करण्यात यावा.

<u>ठराव क्रमांक 84</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर